# विशेष दिवाणी दावा क्रमांक १२९/२०११

## (निशाणी १०८ खालील आदेश)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज खालीलप्रमाणे मुद्दे निश्चित करण्यासाठी सादर केला आहे.

१) दाव्यास कारण घडले नाही ?

२) साठेखताचा दस्त फ्रोडलंट आहे ?

३) साठेखतावर कायदयाची बाधा येते ?

४) दावा हा खोटा व बेकायदा Malicious & vexatious आहे ?

तसेच निशाणी ९९ खालील मुद्दा क्र. ६ मधील ''साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळण्यासाठी'' हा मजकुर नियमित दिवाणी दावा क्र. ४७२/२००२ मध्ये नसल्यामुळे तो या मुद्दयातुन वगळण्यात यावा यासाठी देखील हा अर्ज सादर करण्यात आला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाणी ११० नुसार म्हणूणे सादर केले व न्यायालयाने दोन्ही पक्षांच्या कथनाचा विचार करुन मुद्दे निश्चित केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये वाद कथन सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे. त्यामुळेच मुद्दे योग्य रितीने निश्चित करण्यात आले आहेत. सबब वादीचा अर्ज गुणवत्ताविहिन असल्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा.

३. प्रकरणाची कागदपत्रे अभ्यासली. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला.

४. एकंदर प्रकरणाची वस्तुस्थिती व कागदपत्रे पाहता दोन्ही पक्षांच्या कथनाचा विचार करुन निशाणी ९९ नुसार मुद्दे निश्चित करण्यात आलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणातील साठेखत सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर असल्यामुळे याबाबत मुद्दा क्र.१ ते ३ हे मुद्दे निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यामुळेच अर्जात नमुद केल्याप्रमाणे साठेखत

सिध्द करण्याचा दबाव प्रतिवादींवर टाकण्यात येवून मुद्दे निश्चित करणे न्यायसंगत होणार नाही. त्यामुळेच अर्जात नमुद केल्याप्रमाणे मुद्दे निश्चित करता येणार नाहीत.

**५.** मात्र नियमित दिवाणी दावा क्र. ४७२/२००२ मध्ये उपरोक्त ''साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळावे'' ही मागणी करण्यात आलेली नव्हती व त्यामुळेच ''साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळण्यासाठी'' हा मजकुर नियमित दिवाणी दावा क्र. ४७२/२००२ मध्ये नसल्यामुळे तो या मुद्दयातुन वगळण्यात येणे न्यायसंगत राहिल. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१ अर्ज अंशतः मंजुर करण्यात आला.

२ उपरोक्त साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळण्यासाठी व हा मजकुर मुददा क्र ६ मधुन वगळण्यात यावा.

३ खर्चाबाबत आदेश नाही.

दिनांकः ११.०८.२०१६

(हे भा सिरसाळकर)

**दिवाणी न्यायाधीश व स्तर पंढरपूर**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order

a) Name of the Stenographer/Jr. Clerk : A.K. B. Shaikh . Sure

b) Court : C.J.S.D. Pandharpur

c) Order signed by P. O. : 11/08/2016

d) Order uploaded on : 06/09/2016.